# कोविड लॅब असल्यानेच खरेदीची प्रक्रिया केली सुरु

## विद्यापीठाचे म्हणणे : लॅब सर्व चाचण्यांसाठी वापरणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठात स्थापण करण्यात येणाऱ्या प्रयोगशाळेचा वापर भविष्यात संशोधन व विविध रोगांचे विषाणू चाचणीसाठी करण्यात येणार आहे, परंतु सध्या कोरोनाची महामारी सुरू असल्याने ही प्रयोगशाळा तातडीने सुरू व्हावी यासाठी उपकरणे खरेदीची प्रक्रिया सुरू केल्याचे मंगळवारी विद्यापीठानेच मान्य केले. 'लोकमत'ने त्यासंदर्भातील वृत्त दिल्यावर विद्यापीठ वर्तुळात दिवसभर त्याची जोरदार चर्चा झाली.

विद्यापीठाच्यावतीने कुलसचिवांनी त्यासंदर्भात बाजू स्पष्ट केली. त्यात ते म्हणतात, कोरोनाचे रुग्ण वाढत असल्याने चाचणी प्रयोगशाळा सुरू करण्याबाबत ७ एप्रिलला कुलपतींच्या बैठकीत आवाहन करण्यात आले. त्यानुसार प्रस्ताव तयार करून २१ एप्रिलच्या अधिकार मंडळाच्या बैठकीसमोर ठेवण्यात आली. उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे व जिल्हाधिकाऱ्यांना ६ मे रोजी व नंतर सुधारित ८ मे रोजी प्रस्ताव पाठविला.

शासनाची मान्यता मिळाल्यानंतरच व अधिकार मंडळाच्या अंतिम मंजुरीनंतरच कोरोना तपासणी प्रयोगशाळा सुरु करण्यात येणार आहे. परंतु महामारीच्या काळात तातडीने चाचण्या घेता याव्यात यासाठीच मंजुरीसाठी प्रस्ताव पाठवून आवश्यक साधनसामुग्रीची प्रक्रिया सुरू केली व तसा प्रस्ताव अधिकार मंडळासमोर सादर केला.

# परीक्षेबाबतचा निर्णय आज ?

## ७५ हजार विद्यार्थ्यांच्या परीक्षेबाबत आज ॲकॅडमिक कौन्सिलमध्ये चर्चा

**म. टा. प्रतिनिधी कोल्हापूर**

करोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर पदवी व पदव्युत्तर विभागातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्यासंदर्भात बुधवारी, २७ मे रोजी शिवाजी विद्यापीठाच्या अकॅडमी कौन्सिलमध्ये प्रस्ताव मांडण्यात येणार आहे. अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यासाठी कशा प्रकारे नियोजन करता येईल, याबाबत या बैठकीत सविस्तर चर्चा होणार आहे. या निर्णयावर शिवाजी विद्यापीठातील अंतिम वर्षात शिकणाऱ्या ७५ हजार विद्यार्थ्यांच्या समोर असलेला परीक्षेचा प्रश्न निकाली निघण्याची शक्यता आहे

करोना संसर्गाचा प्रादुर्भाव राज्यात वाढत असल्याने राज्य सरकारच्या उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालयाच्या वतीने पदवी व पदव्युत्तर विभागाच्या पहिल्या व दुसऱ्या वर्षांच्या परीक्षा रद्द करण्याच्या निर्णय घेण्यात आला आहे. अभ्यासक्रम तीन वर्ष कालावधीपेक्षा अधिक कालावधीचे आहेत, अशा विषयांच्या अंतिम वर्षांच्या अंतिम सत्रातील परीक्षा घेण्याबाबत राज्य सरकारचे शिक्षण मंत्रालय विचार करत आहे. अंतिम वर्षाच्या परीक्षेवर विद्यार्थ्यांच्या नोकरीच्या संधी तसेच त्यांचे करिअर अवलंबून असल्याने अंतिम वर्षाच्या परीक्षा घेतल्या जाव्यात, असा विचार केला आहे. याबाबत करोनाच्या पार्श्वभूमीवर यूजीसीने दिलेल्या मार्गदर्शक नियमावलीचा अंतर्भाव करण्यात येणार आहे.

> **‘शिवाजी विद्यापीठाच्या विविध विभागातील अंतिम वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जवळपास ७५ हजार इतकी आहे या परीक्षा जुलै महिन्यात घेण्याबाबत सरकारच्यावतीने सूचना आली आहे. विद्यापीठस्तरावर या परीक्षांचे नियोजन कसे करता येईल, याबाबत आज ॲकॅडमिक कौन्सिलच्या बैठकीत हा विषय चर्चेला मांडण्यात येणार आहे.**
>
> **- गजानन पळसे,** प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ



या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाच्या प्रशासन व परीक्षा विभागाच्या वतीने ही कार्यवाही सुरू आहे. याबाबत बुधवारी अकॅडमी कौन्सिल सदस्यांसमोर बैठकीत या विषयावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय घेण्याची शक्यता आहे.

करोना विषाणूचा संसर्ग राज्यातत मार्चच्या पहिल्या आठवड्यात होण्यास सुरुवात झाली. दरम्यान २७ मार्चपासून शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षांना प्रारंभ होणार होता. परंतु १६ मार्च पासूनच करोनाचा संसर्ग रोखण्यासाठी शाळा, महाविद्यालये बंद करण्याचा निर्णय झाला. या निर्णयानुसार शिवाजी विद्यापीठातील अधिविभाग तसेच प्रशासकीय कामकाज बंद करण्यात आले. २२ मार्चला जनता कर्फ्यू व २५ मार्च नंतर सलग दोन महिने लॉकडाउन असल्याने विद्यापीठाच्या परीक्षा लांबणीवर पडत गेल्या. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देत शिवाजी विद्यापीठाने वसतिगृहातील सर्व विद्यार्थ्यांना आपापल्या गावी पाठवले. सद्यस्थितीत अजूनही करोना संसर्गाचा प्रादुर्भाव आटोक्यात आलेला नाही, तर राज्यातील मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यातही करोनाबाधितांची संख्या झपाट्याने वाढत आहे. एकीकडे करोनाचे सामूहिक संक्रमण वाढण्याचा धोका आणि दुसरीकडे यंदाचे शैक्षणिक वर्ष लांबणीवर पडत असल्याचे चित्र या पार्श्वभूमीवर पदवी व पदव्युत्तर विभागातील अंतिम वर्षाच्या परीक्षा कधी घ्यायच्या व शैक्षणिक सत्र कधीपासून सुरू करायची करावे याबाबत गेल्या दीड महिन्यापासून राज्यस्तरावर नियोजन सुरू आहे. यासाठी राज्यस्तरीय सहा सदस्यीय समिती देखील नेमण्यात आली असून यामध्ये राज्यातील तील चार विद्यापीठांचे कुलगुरु यांचा समावेश आहे. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी गेल्या एक महिन्यात या समितीची सातत्याने परीक्षेबाबत चर्चा केली आहे. एक ते ३१ जुलै या कालावधीत अंतिम वर्षाच्या परीक्षांचे नियोजन राज्यातील विद्यापीठ प्रशासनाने आपल्या शहरातील करोना संसर्गाचे गांभीर्य ओळखून करावे व एक सप्टेंबरपासून नवें शैक्षणिक वर्ष सुरू करावे अशा सूचना दिल्या आहेत. या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठातील विविध विद्याशाखांमध्ये शिकणाऱ्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांची परीक्षा जुलैमध्ये हे घेण्याचा विचार केल्यास सुरक्षित वावर तसेच करोनाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य सुरक्षा व काळजी घेऊन नियोजन करावे याबाबत चर्चा सुरू आहे.

लोकमत



# दरवर्षीप्रमाणेच अंतिम सत्राच्या परीक्षा घ्याव्यात

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : अंतिम सत्राच्या परीक्षार्थ्यांची परीक्षा दरवर्षीप्रमाणे घेण्यात यावी. अंतिम सत्र किंवा या सत्रापूर्वीच्या सत्रामधील अनुत्तीर्ण, गैरहजर असणाऱ्या ज्यांनी परीक्षा अर्ज भरला आहे, त्यांच्या परीक्षा घेण्याचे नियोजन महाविद्यालयांनी करावे, अशा शिफारशी नवीन शैक्षणिक सत्र आणि परीक्षा वेळापत्रक निश्चिती समितीने शिवाजी विद्यापीठाला केल्या आहेत.

राज्य शासनाच्या निर्देशांच्या अनुषंगाने प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांच्या अध्यक्षतेखालील **19** सदस्यीय समितीने परीक्षांच्या नियोजनाबाबतच्या विविध शिफारशी असलेला अहवाल विद्यापीठाला सादर केला आहे.

## अन्य निर्णय, शिफारशी

1. पर्यावरण अभ्यास विषयाची लेखी परीक्षा होणार नाही. प्रकल्प, अंतर्गत गुणावर श्रेणी अथवा गुणदान करावे.
2. गुणांकनात सुधारणा करावयाची असेल, तर त्यांना पुन्हा परीक्षा देण्याची संधी उपलब्ध होणार.
3. अंतिम वर्षाव्यतिरिक्त इतर वर्षाच्या सर्व अभ्यासक्रमाचे विद्यार्थी पुढील वर्षामध्ये प्रवेशासाठी पात्र असतील.
4. ज्या विद्यार्थ्यांना काही कारणास्तव अर्ज भरता आलेले नाहीत, त्यांना अर्ज भरण्याची संधी मिळणार.

“ शिफारसीबाबत विद्या परिषदेच्या बैठकीत अंतिम निर्णय होईल. प्रादुर्भाव वाढल्यास परीक्षांचे नियोजन कसे करता येईल, याबाबत मंगळवारी काही प्राचार्य, आदींशी कुलगुरु, परीक्षा मंडळाचे संचालक, आदींनी चर्चा केली आहे.

- डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरु

### या सूत्रांनुसार गुणदान

ज्या विद्यार्थ्यांनी चालू सत्राच्या (२,४,६,८) परीक्षेसाठी अर्ज भरले आहेत, त्यांचे गुणांकन (एकूण गुण=चालू सत्राचे अंतर्गत मूल्यमापन गुण ५० टक्के अधिक लगतच्या सत्राचे गुण ५० टक्के) या सूत्रांनुसार केले जाईल.

प्रत्यक्ष बोलावून मूल्यमापन करणे शक्य नसेल, तर त्यांचे जर्नल्स मौखिक परीक्षांच्या आधारे मूल्यमापन करावे, आदी शिफारशी आहेत. त्यावर आजच्या विद्या परिषदेच्या बैठकीत निर्णय होईल.

### दि. 1 ते 31 जुलै

या कालावधीत अंतिम सत्राच्या विद्यार्थ्यांसाठी लेखी, प्रात्यक्षिक, मौखिक परीक्षेचे आयोजन करावे. चाचणी, प्रकल्प, आदींचे अंतर्गत मूल्यमापनाचे गुणांकन महाविद्यालयांनी करुन त्याचे गुण सादर करावे. अंतिम सत्राच्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिकांचे स्वरुप, गुणदानाची पद्धत दरवर्षीप्रमाणे असावी.



### अंतिम सत्रातील विद्यार्थी

| | |
|---|---|
| 15000 | बी.ए., बी. कॉम., बी.एस्सी : (प्रत्येकी) |
| 1800 | एम. ए. |
| 2500 | एम. एस्सी |
| 5000 | एम. कॉम. |
| 1200 | बीबीए |
| 1800 | बीसीए |
| 200 | एमसीए |
| 1000 | एमबीए |
| 9000 | अभियांत्रिकी |
| 6400 | इतर अभ्यासक्रम |

पुढारी

# शहरात १,७६१ व्यक्ती क्वारंटाईन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोल्हापूर शहरात १,७६१ व्यक्तींना क्वारंटाईन करण्यात आले आहे. यात महापालिकेच्या १९ सेंटरवर ९८७ नागरिक व होम क्वारंटाईन म्हणून ७७४ नागरिकांना ठेवण्यात आले आहे.

महापालिकेच्या वतीने शेंडापार्क येथील आरोग्य प्रशिक्षण केंद्रातील अलगीकरण कक्षात २५, खासगी हॉटेल (१४ ठिकाणी) २११, अंडी उबवणी केंद्र येथे ६, पंजाबराव देशमुख वसतिगृह ५६, गर्व्हन्मेंट पॉलिटेक्निक ४ व राजाराम कॉलेज ४५, अल्पसंख्याक मुलींचे वसतिगृह ६९, आयसोलेशन हॉस्पिटल ११, कृषी विद्यापीठ वसतिगृह ४८, शिवाजी विद्यापीठ २१८, शिवाजी विद्यापीठ मुलांचे वसतिगृह ६७, न्यू कॉलेज वसतिगृह १०९, सैनिकी मुलींचे वसतिगृह ३९, विवेकानंद कॉलेज २३, कमला कॉलेज २७, डी. बी. पाटील वसतिगृह ६, माई तेंडुलकर वसतिगृह ५, जैन बोर्डिंग १४, लिंगायत वसतिगृह ४, नागरिकांना अलगीकरण कक्षात ठेवण्यात आलेले आहे. या सर्वांना चौदा दिवस या ठिकाणी ठेवण्यात येणार आहे.

पुढारी

# विषाणू तपासणी प्रयोगशाळा शासन नियमानुसारच होणार

## प्रशासनाची भूमिका; प्रस्ताव मंजुरीसाठी सरकारला सादर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील विविध रोगांवरील विषाणू तपासणी प्रयोगशाळा ही शासनाच्या नियमानुसारच होणार आहे. प्रयोगशाळा निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव राज्य सरकारकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे.

कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाने कायमस्वरूपी टेस्टिंग लॅब उभारण्याचा निर्णय घेतला आहे. भविष्यात कोणत्याही साथीच्या आजाराचे निदान करण्यासाठी चाचण्या करता येतील, या दृष्टीने प्रयोगशाळेची उभारणी केली जाणार आहे. प्रशासन आणि विद्यापीठ अधिकाऱ्यांची बैठक झाली आहे. त्यानुसार प्रयोगशाळेचा फेरप्रस्ताव



**शिवाजी विद्यापीठातून...**

जिल्हा प्रशासनाला सादर करण्यात आला आहे.

राज्यपाल यांनी ७ एप्रिल रोजी घेतलेल्या कुलगुरूंच्या ऑनलाईन बैठकीत आपत्ती व्यवस्थापन निधीतून विद्यापीठामध्ये या प्रयोगशाळा तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानंतर विद्यापीठाच्या अधिकार मंडळ बैठकीत यावर चर्चा होऊन मान्यता देण्यात आली. त्यानुसार राज्य शासनास साहित्य खरेदीसह

> विद्यापीठातील विविध रोगांवरील विषाणू संशोधन प्रयोगशाळा राज्यपाल यांचे निर्देश, राज्य सरकारची परवानगी, 'आयसीएमआर'ची मानके पूर्ण करून विद्यापीठ कायद्यानुसार स्थापन केली जाणार आहे.
>
> **- डॉ. देवानंद शिंदे,** कुलगुरू

अन्य गोष्टींचा प्रस्ताव मंजुरीसाठी पाठवण्यात आला आहे. सरकारकडून मान्यता प्राप्त झाल्यानंतर व अधिकार मंडळाच्या अंतिम मंजुरी प्रयोगशाळा स्थापन करण्याबाबतची कार्यवाही होणार आहे.